**सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-यांना निवृत्तिवेतनविषयक लाभ वेळेवर अदा व्हावेत यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ५९ तसेच नियम ११८ ते १२५ च्या तरतूदींचे काटेकोरपणे पालन करणेबाबत..**

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक:- सेनिवे-२०१६/प्र.क्र.३७/सेवा-४**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: २९ एप्रिल, २०१६.

**वाचा -**

**१) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांकः सेनिवे १०००/१२०/सेवा-४, दिनांक १८/४/२०००**

**२) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांकः सेनिवे १००४/१९२/सेवा-४, दिनांक १३/८/२००४**

**३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांकः सेनिवे १००४/२५८/सेवा-४, दिनांक ३०/११/२००४**

**४) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांकः सेनिवे १००५/५/सेवा-४, दिनांक २०/१०/२००५**

**५) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांकः सेनिवे १००६/८१/सेवा-४, दिनांक २०/११/२००६**

**६) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांकः सेनिवे १००८/५०/सेवा-४, दिनांक १७/०६/२००८**

**७) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांकः सेनिवे २०१२/८१/सेवा-४, दिनांक २४/०९/२०१२**

## परिपत्रक

सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतनविषयक लाभ वेळेवर प्रदान केले जावेत यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या प्रकरण १० मधील नियम ११८ ते १२५ मध्ये वेळापत्रक विहीत करण्यात आलेले आहे. सदरहू वेळापत्रकाचे पालन काटेकोरपणे करण्याच्या सूचना उपरोक्त परिपत्रकान्वये विभाग/कार्यालय प्रमुखांना वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. याचे पालन विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांचेकडून करण्यात येत नाही. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम,१९८२ च्या नियम ५९ नुसार राजपत्रित अधिकाऱ्याची २० वर्षांची सेवा आणि अराजपत्रित कर्मचाऱ्याची २५ वर्षाची सेवा पुर्ण झाल्यावर किंवा त्यांच्या सेवानिवृत्तीच्या अगोदर ५ वर्ष, यापैकी कोणत्याही आधीच्या प्रसंगी महालेखापाल कार्यालयाच्या मान्यतेने अर्हताकारी सेवेची पडताळणी करणे आवश्यक आहे. तथापि विभाग/कार्यालय प्रमुखांकडून निवृत्तिवेतन व उपदान प्रत्यक्ष देण्याच्या व प्राधिकृत करण्याच्या तसेच अर्हताकारी सेवेची पडताळणी करण्याच्या विहित कार्यपध्दतीचे पालन करण्यात येत नसल्याचे प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई यांनी शासनाच्या निदर्शनास आणले आहे.

Scanned with OKEN Scanner

२. विभाग/कार्यालय प्रमुखांकडून निवृत्तिवेतन व उपदान प्रत्यक्ष देण्याच्या व प्राधिकृत करण्याच्या विहीत कार्यपध्दतीचे पालन करण्यात न आल्याच्या परिणामी बऱ्याच प्रकरणी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतनविषयक लाभ विलंबाने प्रदान केले जातात. परिणामी निवृत्तिवेतनधारकांना आर्थिक त्रास सहन करावा लागतो. तसेच निवृत्तीवेतनविषयक लाभ विलंबाने प्रदान झाल्यामुळे न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. यामध्ये शासनाच्या वेळेचा व पैशाचा अपव्यय होतो. शिवाय विलंबाने प्रदान केलेल्या निवृत्तिवेतन विषयक रकमांवर व्याज प्रदान करावे लागत असल्यामुळे त्याचा आर्थिक भार शासनाच्या तिजोरीवर पडतो. ही बाब गंभीर आहे.

३. सर्व कार्यालय/विभाग प्रमुखांना याव्दारे पुन्हा असे निदेश देण्यात येत आहेत की, निवृत्तिवेतनविषयक कागदपत्रे महालेखापाल, मुंबई/नागपुर यांचेकडे पाठविताना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ च्या नियम, ५९ तसेच प्रकरण १० मधील नियम ११८ ते १२५ च्या तरतूदींचे पालन काटेकोरपणे करावे. शासनाच्या या आदेशांचे काटेकोरपणे पालन न केल्यामुळे विलंब झाल्याचे निदर्शनास आले तर विलंबास जबाबदार असणारे संबंधित अधिकारी/विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुख यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. तसेच त्यांच्या गोपनीय अहवालात- "निवृत्तिवेतनाची प्रकरणे निकालात काढण्यास अक्षम्य दिरंगाई झाल्याने व्याजापोटी शासनास आर्थिक झळ बसण्यास जबाबदार आहेत."- अशा प्रकारची नोंद घेण्यात यावी.

४. शासन असेही निदेश देत आहे की, सर्व विभाग/कार्यालय प्रमुखांनी उपरोल्लेखित परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल, याबाबत आवश्यक दक्षता घ्यावी. अशी प्रकरणे प्रलंबित राहिल्यास या संबंधातील सर्वतोपरी जबाबदारी विभाग/कार्यालय प्रमुखाची राहील असे पुनश्च: त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४२९१११३३२०८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Hanmantrao Bhosale

Digitally signed by Satish Hanmantrao Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Satish Hanmantrao Bhosale
Date: 2016.04.29 11:18:12 +05'30'

**स.ह. भोसले**
अवर सचिव, वित्त विभाग

**प्रत,**

१) `महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (५० प्रती),
२) महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर(५० प्रती),



Scanned with OKEN Scanner

३) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
४) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५प्रती),
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
६) सहसंचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई (५० प्रती)
७) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),
८) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,(१० प्रती)
९) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
१०) उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),
११) उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),
१२) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
१३) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
१५) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
१६) राज्यपालांचे सचिव,
१७) मुख्य मंत्र्यांचे सचिव,
१८) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
१९) *विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२०) *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा) मुंबई,
२१) *प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
२२) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२३) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२४) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२५) *प्रबंधक, मुंबई महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण /नागपूर/औरंगाबाद
२६) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२७) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)



Scanned with OKEN Scanner

२८) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२

२९) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग,गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माळा, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.

३०) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.

३१) मंत्रालयातील सर्व विभाग,

३२) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,

३३) सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),

३४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

३५) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष

३६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),

३७) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),

३८) तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),

३९) सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),

४०) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),

४१) सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),

४२) सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),

४३) कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),

४४) कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),

४५) कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),

४६) कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),

४७) कुल सचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (१० प्रती),

४८) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, जिल्हा रायगड (१० प्रती),

४९) कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (५ प्रती),



Scanned with OKEN Scanner

५०) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १ (५ प्रती)

५१) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २० (५ प्रती)

५२) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,, मुंबई ४ ( ५ प्रती)

५३) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३ (५प्रती )

५४) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती )

५५) नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१ ( ५ प्रती )

५६) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८ (५ प्रती)

५७) वित्त विभागातील सर्व कार्यासने,

५८) निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

*पत्राद्वारे.



Scanned with OKEN Scanner